जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 JUL 2024

सकाळ

# अतिवृष्टीमुळे विद्यापीठाने आजचे पेपर पुढे ढकलले

कोल्हापूर, ता. २१ : शिवाजी विद्यापीठाच्या कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांत अतिवृष्टी सुरू आहे. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रात येणे अडचणीचे ठरणार आहे. ते लक्षात घेऊन विद्यार्थी हितास्तव विद्यापीठाने सोमवारी (ता. २१) होणारे सर्व पेपर पुढे ढकलले आहेत. त्यात फार्मसी, लॉ, आदी अभ्यासक्रमांच्या पेपरचा समावेश आहे. पेपर स्थगित केल्याची माहिती

पान ९ वर »

# अतिवृष्टीमुळे विद्यापीठाने आजचे पेपर पुढे ढकलले

» पान १ वरून

विद्यार्थ्यांना 'एसएमएस'व्दारे रात्री उशिरा कळविण्यात आली आहे. तसेच ही माहिती विद्यार्थ्यांना देण्याची सूचना महाविद्यालयांना परिपत्रकाद्वारे केली असल्याची माहिती विद्यापीठ परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

विद्यापीठ कार्यक्षेत्रात गेल्या तीन दिवसांपासून अतिवृष्टी सुरू आहे. त्यामुळे नदी नाले ओढे तुडुंब भरून वाहत आहेत. परिणामी, वाहतुकीस अडथळा येत असल्याने विद्यार्थ्यांना परीक्षेला येण्यास त्रास होण्याची शक्यता आहे. त्यामुळे विद्यार्थी हित लक्षात घेता विद्यापीठाने सोमवारी होणारे सर्व विषयांचे पेपर पुढे ढकलण्यात आले आहेत. या बदलाची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. पेपरच्या नव्या तारखा विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केल्या जातील, अशी माहिती डॉ. जाधव यांनी दिली.

दरम्यान, अतिवृष्टीमुळे परीक्षा देणे शक्य होणार नसल्याने सोमवारी होणाऱ्या परीक्षा स्थगित कराव्यात, अशी मागणी काही विद्यार्थ्यांनी राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर यांच्याकडे केली होती. त्यावर क्षीरसागर आणि युवासेना शहरप्रमुख मंदार पाटील यांनी परीक्षा संचालक डॉ. जाधव यांच्यापर्यंत विद्यार्थ्यांची मागणी पोहोचवली. त्याची दखल आणि विद्यार्थी हित लक्षात घेऊन विद्यापीठाने हा निर्णय घेतला आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 JUL 2024
लोकमत

# शिवाजी विद्यापीठाच्या आजच्या परीक्षा रद्द

जिल्ह्यात सुरु असलेल्या अतिवृष्टीमुळे परीक्षार्थींना उपस्थित राहण्यास अडचणी उद्‌भवू शकतात यामुळे विद्यापीठ प्रशासनाने सोमवारी (दि. २२) होणाऱ्या सर्व परीक्षा स्थगित करण्यात आल्या आहेत. या परीक्षांचे सुधारीत वेळापत्रक नंतर जाहीर करण्यात येईल, असे परीक्षा विभागाचे उपकुलसचिव निवास माने यांनी प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 JUL 2024
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाचे आजचे सर्व पेपर पुढे ढकलले

कोल्हापूर : अतिवृष्टीमुळे शिवाजी विद्यापीठ अंतर्गत आज सोमवार (दि.२२) रोजी होणारे सर्व विषयांचे पेपर पुढे ढकलण्यात आले आहेत. यासंदर्भातील माहिती विद्यार्थ्यांना एसएमएसव्दारे रात्री उशिरा कळवली आहे. तर ही माहिती विद्यार्थ्यांना देण्याचे आदेश महाविद्यालयांना परिपत्रकाद्वारे दिले आहेत. अशी माहिती शिवाजी विद्यापीठ परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यात गेल्या तीन दिवसापासून अतिवृष्टी सुरू आहे. त्यामुळे नदी, नाले ओढे तुडुंब भरून वाहत आहेत. परिणामी वाहतुकीस अडथळा येत असल्याने विद्यार्थ्यांना परीक्षेला येण्यास त्रास होण्याची शक्यता आहे. त्यामुळे विद्यार्थी हित लक्षात घेता शिवाजी विद्यापीठाने सोमवारी होणारे सर्व विषयांचे पेपर पुढे ढकलले आहेत. पुढे ढकललेले पेपर कधी होणार या संदर्भातील माहिती यथावकाश शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे. तरी महाविद्यालय व विद्यार्थ्यांनी पेपर पुढे ढकलले आहेत, याची नोंद घ्यावी असे आवाहन परीक्षा विभागाकडून करण्यात आले आहे.



- शिवाजी विद्यापीठाची परिपत्रकाद्वारे माहिती
- रात्री उशिरा विद्यार्थ्यांना एसएमएसद्वारे पेपर रद्दची दिली माहिती

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 JUL 2024
तरुण भारत

# प्रवेश शुल्क परत करण्यात शिवाजी विद्यापीठ अग्रेसर

**अहिल्या परकाळे**
कोल्हापूर

विद्यापीठातील अधिविभाग किंवा कॉलेजला प्रवेश घेऊन रद्द केल्यास विद्यार्थ्याला प्रवेश शुल्क परत करण्याचा नियम आहे. राज्यातील काही महाविद्यालयांनी गेल्या काही वर्षापासून हे प्रवेश शुल्क परत न केल्याच्या तक्रारी अनुदान आयोगाकडे (युजीसी) आल्या आहेत. यावरून युजीसीने प्रवेश शुल्क परत न केल्यास कॉलेज बंद करण्याचा दमच भरला आहे. मात्र शिवाजी विद्यापीठ अंतर्गत २८८ महाविद्यालय व ३४ अधिविभागात विद्यार्थ्यांचे प्रवेश शुल्क परत करण्याची प्रक्रिया दहा वर्षांपासून सुरूच आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठ युजीसीच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करीत असून प्रवेश शुल्क परत करण्यात एक पाऊल पुढे आहे, असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

**अशी असणार कारवाई**

युजीसीने प्रवेश शुल्क परताव्याबाबत नवीन धोरण 'फी रिफंड पॉलिसी २०२४" कडक केले आहे. विद्यार्थ्यांचे प्रवेश शुल्क परत न केल्यास कॉलेज किंवा विद्यापीठातील ऑनलाइन आणि दूरस्थ शिक्षण अभ्यासक्रमांची मान्यता, संस्थेचा स्वायत्त दर्जा काढून, थकबाकीदारांच्या यादीत टाकून त्यांची नावे सार्वजनिक केली जातील. अशा प्रकारची कारवाई करण्याचे युजीसीने आदेश दिले आहेत.

**प्रवेश शुल्क परत करण्याचा नियम**

विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठीचे शुल्क परतावा धोरण जाहीर केले आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांनी ३० सप्टेंबर २०२४ पूर्वी प्रवेश रद्द केल्यास पूर्ण शुल्काचा परतावा करावा लागेल. ३१ ऑक्टोबर २०२४ पर्यंत प्रवेश रद्द केल्यास एक हजार रुपयांपेक्षा कमी रक्कम प्रक्रिया शुल्क म्हणून आकारून उर्वरित शुल्क परत करायचे आहे. याचे उल्लंघन केल्यास कारवाई करण्याचा इशाराही युजीसीकडून देण्यात आला आहे. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने जाहीर केलेल्या नोटीसनुसार पारंपारिक महाविद्यालयांसह अभियांत्रिकी, वैद्यकीय महाविद्यालयांनाही हा नियम लागू आहे.



- युजीसीच्या नियमांचे काटेकोर पालन
- विद्यापीठांतर्गत ३४ अधिविभाग, २८८ महाविद्यालयांचा समावेश

**विद्यार्थ्यांची तक्रार आल्यास कारवाई करणार**

शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने गेल्या दहा वर्षात अर्ज आलेल्या सर्वच विद्यार्थ्यांचे प्रवेश शुल्क परत केले आहे. महाविद्यालयांनाही प्रवेश शुल्क परत करण्याचे सक्तीचे आदेश दिले जातात. त्यामुळे एखाद्या महाविद्यालयाने विद्यार्थ्यांचे प्रवेश शुल्क परत न केल्याची तक्रार आल्यास कडक कारवाई करणार.

– डॉ. व्ही. एन. शिंदे
(कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 JUL 2024
पुण्यनगरी

# विद्यापीठात उद्या प्राचार्य बाळकृष्ण व्याख्यानमाला

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभाग आणि शाहू संशोधन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, दि. २३ रोजी सकाळी ११.३० वाजता राजर्षी शाहू महाराज सिनेट सभागृहात प्राचार्य बाळकृष्ण व्याख्यानमालेचे आयोजन केले आहे. डॉ. बाळकृष्ण हे राजाराम महाविद्यालयाचे प्राचार्य होते. विद्यापीठाचे आद्य संकल्पक म्हणूनही त्यांचा गौरव केला जातो. या व्याख्यानमालेचे पहिले पुष्प ज्येष्ठ इतिहास संशोधक प्रा. डॉ. अरुण भोसले हे गुंफणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के आहेत. प्रमुख उपस्थितीमध्ये प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील उपस्थित राहणार आहेत. तरी या व्याख्यानमालेस उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. अवनिश पाटील (विभागप्रमुख, इतिहास अधिविभाग), डॉ. जयसिंगराव पवार (संचालक, शाहू संशोधन केंद्र), डॉ. व्ही. एन. शिंदे (कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ) यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 JUL 2024
पुढारी.

# विद्यापीठात आज माहितीशास्त्र विभागाची कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र व ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार, दि.२२ रोजी सकाळी १०.३० वाजता राजर्षी शाहू सिनेट हॉल येथे 'अवेअरनेस प्रोग्राम ऑन स्कोपस् अँड निम्बस' या विषयावर कार्यशाळा होणार आहे. कार्यशाळेमध्ये गिरीश कुलकर्णी हे 'निम्बस' वेब स्केल डिस्कव्हरी सेवेविषयी व ऐश्वर्या नायल, एल्सवियर, नवी दिल्ली 'स्कोपस्' या डेटाबेसविषयी व्याख्यान देणार आहेत. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असतील. प्र- कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची विशेष उपस्थिती असणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. धनंजय सुतार, अधिविभागप्रमुख डॉ. सचिनकुमार पाटील यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 JUL 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात उद्या प्राचार्य बाळकृष्ण व्याख्यानमाला

**कोल्हापूर:** शिवाजी विद्यापीठाचा इतिहास अधिविभाग व राजर्षी शाहू संशोधन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, दि. २३ जुलै रोजी सकाळी ११.३० वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू महाराज सिनेट सभागृहात 'प्राचार्य बाळकृष्ण व्याख्यानमालेचे' आयोजन केले आहे.

व्याख्यानमालेचे पहिले पुष्प ज्येष्ठ इतिहास संशोधक प्रा. डॉ. अरुण भोसले गुंफणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के असणार आहेत. प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित राहणार आहेत. विद्यार्थी, प्राध्यापक, इतिहासप्रेमी यांनी व्याख्यानमालेस उपस्थित राहावे, असे आवाहन इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनिश पाटील, शाहू संशोधन केंद्राचे संचालक डॉ. जयसिंगराव पवार यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 JUL 2024
सकाळ

# विद्यापीठात उद्या डॉ. अरुण भोसले यांचे व्याख्यान

कोल्हापूर, ता. २१ : शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभाग आणि शाहू संशोधन केंद्रातर्फे मंगळवारी (ता. २३) सकाळी साडेअकरा वाजता राजर्षी शाहू महाराज सिनेट सभागृहात प्राचार्य बाळकृष्ण व्याख्यानमाला होणार आहे. त्यातील पहिले पुष्प ज्येष्ठ इतिहास संशोधक प्रा. डॉ. अरुण भोसले गुंफणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील उपस्थित राहणार आहेत. व्याख्यानमालेस उपस्थित राहावे, असे आवाहन इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 JUL 2024

पुण्यनगरी

# गुणवत्ता शिष्यवृत्तीमध्ये न्यू कॉलेज प्रथम

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्तीमध्ये न्यू कॉलेजने प्रथम येत यंदाही बाजी मारली. मानव विज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन अशा दोन विद्या शाखांमध्ये शहरी विभागामध्ये प्रथम क्रमांक मिळवला आहे. एकूण ३७ विद्यार्थ्यांनी विद्यापीठाची शिष्यवृत्ती मिळवून दबदबा निर्माण केला आहे. क्रीडा प्रकारांमध्ये सलग ६ वर्षे मेघनाथ नागेशकर क्रीडा चषक मिळवून महाविद्यालय विद्यापीठामध्ये अग्रेसर राहिले आहे. न्यू कॉलेजने यंदा दोन विद्याशाखांमध्ये प्रथम क्रमांक मिळवले आहेत. त्याबद्दल प्राचार्या डॉ. व्ही. एम. पाटील यांचा शिवाजी विद्यापीठामध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा नियंत्रक डॉ. अभयसिंह जाधव उपस्थित होते. संस्थेचे चेअरमन के. जी. पाटील यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

जनसंपर्क कक्ष
22 JUL 2024 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'दूरशिक्षण'ची प्रवेशप्रक्रिया सुरू

कोल्हापूर, ता. २१ : शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रातील बी. ए., बी.कॉम. अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यासाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत ३१ ऑगस्टपर्यंत आहे.

जे विद्यार्थी अजूनही शिक्षणापासून वंचित आहेत, ज्यांचे शिक्षण अपूर्ण आहे, तसेच शासकीय व निम्न शासकीय अथवा खासगी कर्मचारी, सेवक अशा इच्छुकांना दूरशिक्षण आणि ऑनलाइन शिक्षण केंद्राच्या एकूण ८६ अभ्यासकेंद्रांत प्रवेशाची संधी मिळणार आहे. त्यामुळे विद्यार्थी, गृहिणी, कामगार, सैनिक आदींनी आपला प्रवेश निश्चित करावा. बी. ए., बी. कॉम या पदवी अभ्यासक्रमाचे द्वितीय व तृतीय वर्षाचे प्रवेश आणि एम.ए.,एम. कॉम,एम.एस्सी (गणित) व एम.बी.ए.दूरस्थ या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी द्वितीय वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेबाबतची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे. जे विद्यार्थी नियमित प्रवेशित झालेले आहेत, अशा विद्यार्थ्यांना दुहेरी पदवीचा ही लाभ मिळणार आहे, अशी माहिती प्रा. डी. के. मोरे यांनी दिली.

22 JUL 2024 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘मोफत शिक्षण’ हवे, तर आधी करा नोंदणी

## महाविद्यालयांमध्ये सुरू होणार स्वतंत्र कक्ष; मुलींना घ्यावी लागणार दक्षता

संतोष मिठारी : सकाळ वृत्तसेवा

| जिल्हा | अनुदानित महाविद्यालये | विनाअनुदानित महाविद्यालये | एकूण |
| --- | --- | --- | --- |
| कोल्हापूर | ५४ | ८१ | १३५ |
| सांगली | ४१ | ४६ | ८७ |
| सातारा | ३८ | ३२ | ७० |
| शासकीय | - | -४ | |

बी.एड., लॉ अभ्यासक्रमांची महाविद्यालये

| जिल्हा | बी.एड. | लॉ |
| --- | --- | --- |
| कोल्हापूर | ४ | ४ |
| सांगली | ३ | ३ |
| सातारा | ३ | ३ |

कोल्हापूर, ता. २१ : व्यावसायिक अभ्यासक्रमांचे मोफत शिक्षण हवे असेल, तर मुलींनी त्यासाठी आधी महाविद्यालयांत नोंदणी करणे आवश्यक आहे. या नोंदणीबाबतची दक्षता या मुलींसह महाविद्यालयांना घ्यावी लागणार आहे. राज्य शासनाने जाहीर केलेल्या शिक्षण आणि परीक्षा शुल्क लाभाच्या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी महाविद्यालयांमध्ये स्वतंत्र कक्ष सुरू होणार आहे. त्यादृष्टीने उच्च व तंत्रशिक्षण विभागाने प्राचार्यांना सूचना केल्या आहेत.

सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या मुलींना उच्च व तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय आणि मत्स्य व्यवसाय, इतर मागास बहुजन कल्याण विभागांकडून सध्या देण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के लाभाऐवजी शंभर टक्के लाभ देण्यास यावर्षीपासून शासनाने मान्यता दिली आहे. त्याची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या निर्देशानुसार विविध सूचना कोल्हापूर विभागीय सहसंचालक कार्यालयाने कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील २९६ महाविद्यालयांच्या प्राचार्यांना केल्या आहेत. या कोल्हापूर विभागात बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी. या पारंपरिक अभ्यासक्रमांसाठी मुलींना शंभर टक्के आणि विधी (लॉ), बी. एड. अभ्यासक्रमासाठी ५० टक्के शिक्षण, परीक्षा शुल्क माफीचा लाभ दिला जात होता. आता त्या सर्व अभ्यासक्रमांसाठी शंभर टक्के शुल्क माफीचा लाभ दिला जाणार आहे. त्यामुळे व्यावसायिक आणि उच्च शिक्षणातील मुलींचा टक्का वाढण्यास मदत मिळणार आहे.

> “शिक्षण आणि परीक्षा शुल्काच्या लाभापासून कोणतीही मुलगी वंचित राहू नये यासाठी त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी महाविद्यालयांमध्ये कक्ष स्थापन करावा. त्यांच्या याबाबतच्या अडचणी सोडवाव्यात. सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी या योजनेसाठी पात्र असलेल्या विद्यार्थिनींची शंभर टक्के नोंदणी होईल याची दक्षता घ्यावी. विद्यार्थिनींनी या योजनेचा लाभ मिळविण्यासाठी महाविद्यालयात नोंदणी करणे आवश्यक आहे.
> **-डॉ. अशोक उबाळे**, उच्च शिक्षण सहसंचालक, कोल्हापूर विभाग

### शुल्क भरले असेल, तर परत मिळणार

विविध व्यावसायिक, व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षा, शुल्क अथवा शिक्षण शुल्कापोटी प्रवेशाचे शुल्क या वर्षी विद्यार्थिनींनी भरले असेल, तर त्यांनाही ते शुल्क परत मिळणार आहे. मात्र, त्यांनी याबाबत महाविद्यालयाकडे अर्ज करणे आवश्यक असल्याचे डॉ. उबाळे यांनी सांगितले. कोल्हापूर विभागात गेल्या वर्षी विविध शिष्यवृत्ती योजनेचा सुमारे ३३ हजार विद्यार्थ्यांनी लाभ घेतला होता. आता मुलींच्या शंभर टक्के शिक्षण, परीक्षा शुल्क लाभाच्या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी केली जाईल. त्याबाबत प्राचार्यांना मार्गदर्शन करण्यासाठी पुढील आठवड्यापासून जिल्हानिहाय बैठका घेतल्या जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

22 JUL 2024 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या आजच्या सर्व परीक्षा स्थगित

## अतिवृष्टीमुळे निर्णय; डॉ. अजितसिंह जाधव यांची माहिती

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

अतिवृष्टीमुळे शिवाजी विद्यापीठाने सोमवार, दि. २२ रोजी होणाऱ्या सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा स्थगित केल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

सध्या शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील मार्च-एप्रिल २०२४ च्या परीक्षा सुरू आहेत. विद्यापीठ कार्यक्षेत्रात २९५ महाविद्यालये असून, सुमारे २ लाख ५० हजारांहून अधिक विद्यार्थी आहेत. सध्या विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली व



सातारा जिल्ह्यांत अतिवृष्टी सुरू आहे. सोमवारी औषधनिर्माणशास्त्र, विधीसह इतर अभ्यासक्रमांच्या परीक्षा होणार होत्या; परंतु अतिवृष्टीमुळे विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रांवर उपस्थित राहण्यासाठी अडचणी येऊ शकतात. त्यामुळे विद्यार्थी हिताचा विचार करून सोमवारी होणाऱ्या सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा स्थगित करण्यात आल्या आहेत. याबाबतचे परिपत्रक रविवारी रात्री उशिरा परीक्षा विभागाचे उपकुलसचिव निवास माने यांनी विद्यापीठ संलग्न सर्व महाविद्यालयांना पाठविले आहे. स्थगित करण्यात आलेल्या परीक्षांचे सुधारित वेळापत्रक यथावकाश शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल, असे डॉ. जाधव यांनी सांगितले.